12 JUN 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रायगडावर ७५० पोती प्लास्टिक केले गोळा

## शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांची स्वच्छता मोहीम

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्षातर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही शिवराज्याभिषेक दिन सोहळ्याच्या निमित्ताने १५० स्वयंसेवकांच्या साथीने रायगडावर स्वच्छता, प्लास्टिक मुक्ती मोहीम राबविली.

या मोहिमेंतर्गत ७५० गोणी प्लास्टिक व अन्य कचरा संकलन केले. मंत्री भरत गोगावले यांच्यासह माजी खासदार संभाजीराजे यांनी विद्यार्थ्यांच्या या कार्याचे कौतुक केले. विद्यापीठाच्या वतीने ४ जून ते ८ जून या कालावधीत १५० स्वयंसेवकांसह रायगड परिक्रमेसह किल्ले रायगडाची स्वच्छता मोहीम पार पाडली. या मोहिमेमध्ये पहिल्या दिवशी इतिहास अभ्यासक प्रा. भिकाजी लाड यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यवस्थापन कौशल्य याविषयी माहिती दिली. इतिहास अधिविभागाचे प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी शिवाजी महाराजांच्या यशस्वी मोहिमांबद्दल माहिती दिली. शिवराज्याभिषेक दिनाच्या आदल्या दिवशी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी संपूर्ण रायगडाची स्वच्छता केली. ७ जून २०२५ रोजी पुन्हा रायगडावर निर्माण झालेला कचरा तसेच प्लास्टिक संकलित करून ते पुनर्प्रक्रियेसाठी पाठविले. राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. तानाजी चौगले यांच्या नेतृत्वाखाली डॉ. पी. आर. माळी, डॉ. गोरखनाथ किर्दत, डॉ. सचिन चव्हाण यांनी शिबिराचे संयोजन केले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.



शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे रायगडावर स्वच्छता मोहीम राबविली. यावेळी स्वयंसेवकांसमवेत माजी खासदार संभाजीराजे छत्रपती, शहाजीराजे, तानाजी चौगुले उपस्थित होते.

12 JUN 2025
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
विद्यापीठ, को




रायगड : स्वच्छता मोहिमेत स्वयंसेवकासमवेत सहभागी संभाजीराजे छत्रपती, शहाजीराजे छत्रपती.

# शिवराज्यभिषेक दिनी रायगडावर स्वच्छता मोहीम

## शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे सातशे पन्नास गोणी कचरा संकलन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने रायगडावर शिवराज्याभिषेक दिनाच्या निमित्ताने स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या स्वच्छता मोहिमेत ७५० गोणी प्लास्टीक व अन्य कचरा संकलन केला.स्वयंसेवकांसमवेत युवराज संभाजीराजे छत्रपती, शहाजीराजे छत्रपती, डॉ. तानाजी चौगुले या मोहिमेत सहभागी झाले होते.

शिवाजी विद्यापीठाच्यावतीने ४ ते ८ जून २०२५ या कालावधीत १५० स्वयंसेवकांसह रायगड परिक्रमेसह शिवराजधानी किल्ले रायगडची

**■ दीडशे स्वयंसेवकानी घेतला सहभाग**

स्वच्छता मोहीम पार पाडण्यात आली. या मोहिमेमध्ये पहिल्या दिवशी इतिहास अभ्यासक प्रा. भिकाजी लाड यांनी विद्यार्थ्यांना राजधानी रायगड आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यवस्थापन कौशल्य याविषयी सप्रमाण माहिती सादर केली. दुसऱ्या दिवशी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागाचे प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी शिवाजी महाराजांच्या यशस्वी मोहिमांबद्दल आणि त्यांनी स्वराज्य स्थापनेसाठी केलेल्या कार्याबद्दल माहिती दिली. शिवराज्याभिषेक दिनाच्या आदल्या दिवशी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी संपूर्ण रायगडची स्वच्छता केली. स्वच्छतेमध्ये ४५० गोणी प्लास्टिक संकलन व इतर कचरा संकलन त्याचबरोबर पर्यावरण रक्षणाबाबत घोषणा आणि फलकांद्वारे जनजागृती केली.

७ रोजी पुन्हा रायगडावर निर्माण झालेला कचरा तसेच प्लास्टिक संकलित करून ते पुनर्प्रक्रियेसाठी पाठवण्यात आले. या स्वच्छता मोहिमेअंतर्गत रायगड किल्ल्यावरील होळीचा माळ ते जगदीश्वर मंदिर मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज यांचे समाधीस्थळ परिसर, राजसदर परिसर, बाजारपेठ परिसर तसेच रोपवेपर्यंतच्या रस्त्यावरील साफसफाई आणि महादरवाजा ते चित्त दरवाजा या गडउतार होण्याच्या पायी मार्गावर स्वयंसेवकांनी स्वच्छता मोहीम राबवली. यामध्ये सुमारे ३०० बॅग प्लास्टिक स्वयंसेवकांनी संकलित केले. मोफत अन्नछत्र दिलेल्या समितीचे सर्व साहित्य गडापासून रोपवेपर्यंत पोहोचविण्याचे काम केले. डॉ. तानाजी चौगले यांच्या नेतृत्वाखाली डॉ. पी. आर. माळी, डॉ गोरखनाथ किर्दत, डॉ. सचिन चव्हाण डॉ. के एस शिंदे, डॉ. कमलसिंह क्षत्रिय, डॉ. संदीप पाटील व प्रा. अजय दळवी, प्रा. मल्लिकार्जुन भैरगोंड यांनी शिबिराचे संयोजन केले.

12 JUN 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठातर्फे रायगडावर स्वच्छता मोहीम

## साडेसातशे गोणी प्लास्टिक, अन्य कचरा संकलन; पर्यावरण संवर्धनाचा संदेश



**किल्ले रायगड :** शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे शिवराज्याभिषेक दिनाच्या निमित्ताने स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. स्वयंसेवकांसमवेत संभाजीराजे छत्रपती, शहाजीराजे छत्रपती, डॉ. तानाजी चौगुले आदी.

कोल्हापूर, ता. ११ : शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्षातर्फे यंदाही शिवराज्याभिषेक दिन सोहळ्यानिमित्त १५० स्वयंसेवकांच्या साथीने रायगडावर स्वच्छता आणि प्लास्टिक मुक्ती मोहीम राबवून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. ७५० गोणी प्लास्टिक व अन्य कचरा संकलन करण्यात आले.

विद्यापीठातर्फे ४ ते ८ जून दरम्यान रायगड परिक्रमेसह शिवराजधानी किल्ले रायगडची स्वच्छता मोहीम पार पडली. यात इतिहास अभ्यासक प्रा. भिकाजी लाड यांनी राजधानी रायगड आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यवस्थापन कौशल्य याविषयी माहिती दिली. इतिहास अधिविभागाचे प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी शिवाजी महाराजांच्या यशस्वी मोहिमांबद्दल आणि त्यांनी स्वराज्य स्थापनेसाठी केलेल्या कार्याबद्दल माहिती दिली. शिवराज्याभिषेक दिनाच्या आदल्या दिवशी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी संपूर्ण रायगडची स्वच्छता केली. रायगडावर निर्माण झालेला कचरा, तसेच प्लास्टिक संकलित करून ते पुनर्प्रक्रियेसाठी पाठवले. किल्ल्यावरील होळीचा माळ ते जगदीश्वर मंदिर मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज यांचे समाधिस्थळ परिसर, राजसदर परिसर, बाजारपेठ परिसर, तसेच रोपवेपर्यंतच्या रस्त्यावरील साफसफाई आणि महादरवाजा ते चित्त दरवाजा या गडउतार होण्याच्या पायी मार्गावर स्वयंसेवकांनी स्वच्छता मोहीम राबवली. विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. तानाजी चौगले यांच्या नेतृत्वाखाली एनएसएसचे कार्यक्रमाधिकारी डॉ. पी. आर. माळी, गोरखनाथ किर्दत, सचिन चव्हाण, के. एस. शिंदे, कमलसिंह क्षत्रिय, संदीप पाटील, अजय दळवी, मल्लिकार्जुन भैरगोंड यांनी शिबिराचे संयोजन केले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज ॲंड व्ह्यूज
12 JUN 2025

वामाक्षी
9175089609

# शिवाजी विद्यापीठाच्या वतीने रायगडावर स्वच्छता मोहीम

## ७५० गोणी प्लास्टीक व अन्य कचरा संकलन

कोल्हापूर,( महान्यू ॲंड व्ह्यूज):

शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्षातर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही शिवराज्याभिषेक दिन सोहळ्याच्या निमित्ताने १५० स्वयंसेवकांच्या साथीने रायगडावर स्वच्छता आणि प्लास्टिक मुक्ती मोहीम राबवून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. या मोहिमेअंतर्गत ७५० गोणी प्लास्टीक व अन्य कचरा संकलन करण्यात आले. महाराष्ट्राचे मंत्री भरत गोगावले यांच्यासह युवराज संभाजीराजे छत्रपती यांनी विद्यार्थ्यांच्या या कार्याचे कौतुक केले.



शिवाजी विद्यापीठाच्या वतीने दि. ४ जून ते ८ जून २०२५ या कालावधीत १५० स्वयंसेवकांसह रायगड परिक्रमेसह शिवराजधानी किल्ले रायगडची स्वच्छता मोहीम पार पाडण्यात आली. या मोहिमेमध्ये पहिल्या दिवशी इतिहास अभ्यासक प्रा. भिकाजी लाड यांनी आपल्या खास शैलीत विद्यार्थ्यांना राजधानी रायगड आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यवस्थापन कौशल्य याविषयी सप्रमाण माहिती सादर केली. दुसऱ्या दिवशी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागाचे प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी शिवाजी महाराजांच्या यशस्वी मोहिमांबद्दल आणि त्यांनी स्वराज्य स्थापनेसाठी केलेल्या कार्याबद्दल माहिती दिली. शिवराज्याभिषेक दिनाच्या आदल्या दिवशी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी संपूर्ण रायगडची स्वच्छता केली. स्वच्छतेमध्ये ४५० गोणी प्लास्टिक संकलन व इतर कचरा संकलन त्याचबरोबर पर्यावरण रक्षणाबाबत घोषणा आणि फलकांद्वारे जनजागृती केली.

७ जून २०२५ रोजी पुन्हा रायगडावर निर्माण झालेला कचरा तसेच प्लास्टिक संकलित करून ते पुनर्प्रक्रियेसाठी पाठवण्यात आले. या स्वच्छता मोहिमेअंतर्गत रायगड किल्ल्यावरील होळीचा माळ ते जगदीश्वर मंदिर मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज यांचे समाधीस्थळ परिसर, राजसदर परिसर, बाजारपेठ परिसर तसेच रोपवेपर्यंतच्या रस्त्यावरील साफसफाई आणि महादरवाजा ते चित्त दरवाजा या गडउतार होण्याच्या पायी मार्गावर स्वयंसेवकांनी स्वच्छता मोहीम राबवली. यामध्ये सुमारे ३०० बॅग प्लास्टिक स्वयंसेवकांनी संकलित केले. याबरोबरच स्वयंसेवकांनी रायगडावर राज्याभिषेक दिनी मोफत अन्नछत्र दिलेल्या समितीचे सर्व साहित्य गडापासून रोपवेपर्यंत पोहोचविण्याचे काम केले. विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. तानाजी चौगले यांच्या नेतृत्वाखाली एनएसएसचे कार्यक्रमाधिकारी डॉ. पी. आर. माळी, डॉ गोरखनाथ किर्दत, डॉ. सचिन चव्हाण डॉ. के एस शिंदे, डॉ. कमलसिंह क्षत्रिय, डॉ. संदीप पाटील व प्रा. अजय दळवी, प्रा. मल्लिकार्जुन भैरगोंड यांनी शिबिराचे संयोजन केले. विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी यांनी मोहीम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. मोहिमेसाठी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

यावेळी मंत्री भरत गोगावले यांनी शिबिरास भेट देऊन विद्यार्थ्यांच्या कामाचे कौतुक केले. युवराज संभाजीराजे छत्रपती, संयोगितराजे छत्रपती, शहाजीराजे छत्रपती यांनीही शिबिरास भेट देऊन विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून प्रोत्साहन दिले.

जनसंपर्क कक्ष
12 JUN 2025
पुण्यनगरी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या वतीने रायगडावर स्वच्छता मोहीम

■ ७५० गोणी प्लास्टिक व अन्य कचरा संकलन



▮ कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्षातर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही शिवराज्याभिषेक दिन सोहळ्याच्या निमित्ताने १५० स्वयंसेवकांच्या साथीने रायगडावर स्वच्छता आणि प्लास्टिक मुक्ती मोहीम राबवून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. या मोहिमेअंतर्गत ७५० गोणी प्लास्टीक व अन्य कचरा संकलन करण्यात आले. महाराष्ट्राचे मंत्री भरत गोगावले यांच्यासह युवराज संभाजीराजे छत्रपती यांनी विद्यार्थ्यांच्या या कार्याचे कौतुक केले.

शिवाजी विद्यापीठातर्फे दि. ४ ते ८ जून या कालावधीत १५० स्वयंसेवकांसह रायगड परिक्रमेसह शिवराजधानी किल्ले रायगडची स्वच्छता मोहीम पार पाडण्यात आली. या मोहिमेमध्ये प्रा. भिकाजी लाड आणि डॉ. अवनीश पाटील यांनी शिवाजी महाराजांच्या यशस्वी मोहिमांबद्दल माहिती दिली. शिवराज्याभिषेक दिनाच्या आदल्या दिवशी ४५० गोणी प्लास्टिक संकलन केला. तर दि. ७ जून रोजी ३०० बॅग प्लास्टिक स्वयंसेवकांनी संकलित केले.

विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. तानाजी चौगले, डॉ. पी. आर. माळी, डॉ गोरखनाथ किर्दत, डॉ. सचिन चव्हाण डॉ. के. एस. शिंदे, डॉ. कमलसिंह क्षत्रिय, डॉ. संदीप पाटील व प्रा. अजय दळवी, प्रा. मल्लिकार्जुन भैरगोंड यांनी शिबिराचे संयोजन केले.

जनसंपर्क कक्ष

12 JUN 2025 लोकमत

# दूरशिक्षणची आज एमबीए प्रवेश प्रक्रिया फेरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण आणि ऑनलाइन शिक्षण केंद्रामार्फत एमबीए (डिस्टन्स मोड) या अभ्यासक्रमासाठी चालू शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी १६ मे रोजी घेण्यात आलेल्या प्रवेश परीक्षेनुसार विद्यार्थ्यांची प्रवेशप्रक्रिया फेरी गुरुवारी (दि. १२) स. १० वा. घेण्यात येणार असल्याची माहिती प्र.संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी दिली.

एमबीए अभ्यासक्रमासाठी विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्रज्ञान शिक्षण परिषद यांची मान्यता आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना मार्केटिंग, मानवी संसाधन व्यवस्थापन, ऑपरेशन आणि प्रोडक्शन व्यवस्थापन तसेच वित्तीय व्यवस्थापन या विषयातून एमबीए ( डिस्टन्स मोड) पूर्ण करता येणार आहे. या प्रवेशप्रक्रियेतून दूरशिक्षण व ऑनलाइन केंद्र, विवेकानंद महाविद्यालय, सद्‌गुरु गाडगे महाराज महाविद्यालय कराड, कला, वाणिज्य महाविद्यालय पलूस, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगूड व श्री. व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी येथील अभ्यास केंद्रात प्रवेशित होता येणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JUN 2025
तरुण भारत



# शिवाजी विद्यापीठाची एमबीए प्रवेश फेरी आज

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत एमबीए (डिस्टन्स मोड) या अभ्यासक्रमासाठी चालू शैक्षणिक वर्षासाठी शिवाजी विद्यापीठाकडून घेण्यात आलेल्या प्रवेश परीक्षेनुसार विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया फेरी आज होणार असल्याची माहिती प्र. संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी दिली. सकाळी १० वाजता प्रवेश फेरीला सुरूवात होणार आहे. या प्रवेश प्रक्रियेतून दूरशिक्षण व ऑनलाईन केंद्र, विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूर, सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालय कराड, कला, वाणिज्य महाविद्यालय पलूस, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगूड व श्री. व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी येथील अभ्यास केंद्रात प्रवेशित होता येणार आहे. विद्यार्थ्यांनी दूर शिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या मुख्य कार्यालयामध्ये प्रवेश प्रक्रियेसाठी कागदपत्रे घेऊन उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

12 JUN 2025 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्रात आज एमबीए प्रवेश प्रक्रिया

कोल्हापूर, ता. ११ : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे एमबीए (डिस्टन्स मोड) या अभ्यासक्रमांचे शिक्षण दिले जाते. या वर्षी विद्यापीठाकडून १६ मे रोजी घेतलेल्या प्रवेश परीक्षेनुसार विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया फेरी उद्या, गुरुवारी सकाळी दहा वाजता घेण्यात येणार आहे.

एम.बी.ए. अभ्यासक्रमासाठी विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्रज्ञान शिक्षण परिषद यांची मान्यता आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना मार्केटिंग, मानवी संसाधन व्यवस्थापन, ऑपरेशन आणि प्रोडक्शन व्यवस्थापन तसेच वित्तीय व्यवस्थापन या विषयातून एम.बी.ए. (डिस्टन्स मोड) पूर्ण करता येणार आहे. या प्रवेश प्रक्रियेतून दूरशिक्षण व ऑनलाईन केंद्र, विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूर, सद्‌गुरु गाडगे महाराज महाविद्यालय कराड आणि कला, वाणिज्य महाविद्यालय पलूस, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगूड, श्री व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी येथील अभ्यास केंद्रात प्रवेशित होता येणार आहे.

ज्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाची प्रवेश परीक्षा दिली आहे अथवा महा-सीईटी, एटीएमए दिली आहे. त्यांना थेट प्रवेश मिळेल. अशा विद्यार्थ्यांनी दूर शिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या मुख्य कार्यालयामध्ये प्रवेश प्रक्रियेसाठी कागदपत्रे घेऊन उपस्थित राहावे, असे आवाहन दूरशिक्षण केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JUN 2025
पुढारी

# दूरशिक्षणची आज एमबीए प्रवेश प्रक्रिया फेरी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत एमबीए अभ्यासक्रमासाठी चालू शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया फेरी दि.१२ जून रोजी सकाळी दहा वाजता घेण्यात येणार असल्याची माहिती प्र. संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी दिली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JUN 2025
पुण्यनगरी

# आज एमबीए प्रवेश प्रक्रिया फेरी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**



शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत एमबीए (डिस्टन्स मोड) या अभ्यासक्रमासाठी चालू शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया राबवली जात आहे. विद्यापीठाकडून दि. १६ मे रोजी प्रवेश परीक्षा घेण्यात आली होती. त्यानुसार प्रवेश प्रक्रिया फेरी गुरुवार, दि. १२ जून रोजी सकाळी १० वाजता घेण्यात येणार असल्याची माहिती प्र. संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी दिली.

एमबीए अभ्यासक्रमासाठी विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्रज्ञान शिक्षण परिषद यांची मान्यता आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना मार्केटिंग, मानवी संसाधन व्यवस्थापन, ऑपरेशन आणि प्रोडक्शन व्यवस्थापन व वित्तीय व्यवस्थापन या विषयांतून एमबीए (डिस्टन्स मोड) पूर्ण करता येणार आहे. या प्रवेश प्रक्रियेतून दूरशिक्षण व ऑनलाईन केंद्र, विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूर, सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालय कराड, कला, वाणिज्य महाविद्यालय पलूस, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगूड व श्री व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी येथील अभ्यास केंद्रात प्रवेशित होता येणार आहे. ज्या विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाची प्रवेश परीक्षा दिलेली आहे अथवा सीईटी दिली आहे, त्यांना थेट प्रवेश मिळेल. अशा विद्यार्थ्यांनी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या मुख्य कार्यालयामध्ये प्रवेश प्रक्रियेसाठी कागदपत्रे घेऊन उपस्थित राहावे, असे आवाहन प्रभारी संचालक डॉ. पाटील यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज

12 JUN 2025




# दूरशिक्षणची आज एमबीए प्रवेश प्रक्रिया फेरी

**कोल्हापूर ( महान्यू अँड व्ह्यूज):**

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत एमबीए ( डिस्टन्स मोड) या अभ्यासक्रमासाठी चालू शैक्षणिक वर्ष २०२५ -२६ साठी शिवाजी विद्यापीठाकडून दि.१६ मे रोजी घेण्यात आलेल्या प्रवेश परीक्षेनुसार विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया फेरी गुरुवार दि.१२ जून रोजी सकाळी दहा वाजता घेण्यात येणार असल्याची माहिती प्र.संचालक डॉ.के.बी.पाटील यांनी दिली आहे.

एम.बी.ए. अभ्यासक्रमासाठी विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्रज्ञान शिक्षण परिषद यांची मान्यता आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना मार्केटिंग, मानवी संसाधन व्यवस्थापन, ऑपरेशन आणि प्रोडक्शन व्यवस्थापन तसेच वित्तीय व्यवस्थापन या विषयातून एम.बी.ए. (डिस्टन्स मोड) पूर्ण करता येणार आहे. या प्रवेश प्रक्रियेतून दूरशिक्षण व ऑनलाईन केंद्र, विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूर, सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालय कराड, कला, वाणिज्य महाविद्यालय पलूस, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगूड व श्री. व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी येथील अभ्यास केंद्रात प्रवेशित होता येणार आहे.

ज्या विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाची प्रवेश परीक्षा दिलेली आहे अथवा MAH-CET/ATMA दिली आहे. त्यांना थेट प्रवेश मिळेल.अशा विद्यार्थ्यांनी दूर शिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या मुख्य कार्यालयामध्ये प्रवेश प्रक्रियेसाठी कागदपत्रे घेऊन उपस्थित राहावे,असे आवाहन प्रभारी संचालक डॉ.के.बी.पाटील यांनी केले आहे.

12 JUN 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ऑनस्क्रिनमुळे आठवड्यात लागणार परीक्षांचे निकाल

**शिवाजी विद्यापीठांतर्गत परीक्षांची पेपर तपासणी ऑनस्क्रिन करण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे. मार्च-एप्रिल २०२५ उन्हाळी सत्रातील परीक्षेच्या १ लाख ६ हजार ४७८ उत्तरपत्रिकांची तपासणी डिजीटल ईव्हॅल्युएशन सिस्टीम (Digital Evaluation System) या संगणकीय प्रणालीद्वारे ऑनस्क्रिन केली आहे. त्यामुळे वेळेची बचत होऊन महिना, सव्वामहिन्यानंतर लागणारा परीक्षेचा निकाल आठवड्यात लागेल. विद्यार्थ्यांनाही मागणीनुसार फोटोकॉपी लगेच मिळेल. राज्यातील काही मोजक्या विद्यापीठानंतर शिवाजी विद्यापीठात हा पायलट प्रोजेक्ट राबवण्यात येत आहे.**

- शिवाजी विद्यापीठातील पथदर्शी प्रकल्प यशस्वी
- ऑनलाईन तपासल्या जाणार १ लाख ६ हजार ४७८ उत्तरपत्रिका
- उर्वरित अभ्यासक्रमांच्या परीक्षांसाठी प्रणाली वापरणार

तरुण भारत अँकर



अहिल्या परकाळे
कोल्हापूर

राज्यातील काही मोजक्या विद्यापीठांत डिजीटल ईव्हॅल्युएशन सिस्टीम ही पध्दत वापरली जाते. शिवाजी विद्यापीठानेही एम.ए., एम.कॉम, एम.एससी.च्या ३४ अभ्यासक्रमांच्या उत्तरपत्रिका या प्रणालीद्वारे तपासल्या आहेत. भविष्यात उर्वरित अभ्यासक्रमांच्या उत्तरपत्रिकांची संगणकीय तपासणी करण्याचा प्रयत्न विद्यापीठ करणार आहे.

संगणकीय प्रणालीद्वारे (ऑनस्क्रिन) निवडक पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या उत्तरपत्रिका तपासण्याची प्रक्रिया २०२४-२५ शैक्षणिक वर्षापासून सुरू केली आहे. ऑनस्क्रिन पेपर तपासणीचा प्रयोग यशस्वी झाल्यामुळे भविष्यात सर्वच अभ्यासक्रमांच्या उत्तरपत्रिका तपासणीसाठी ही पद्धत वापरली जाणार आहे. सध्या विद्यापीठातील अधिविभाग, संलग्नित महाविद्यालयांत ३४ पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकवले जातात. या अभ्यासक्रमांच्या ८०० परीक्षांना अडीच लाख विद्यार्थी बसतात. त्यामुळे विद्यापीठाने संगणक प्रणालीद्वारे उत्तरपत्रिका तपासणीचा निर्णय घेतला आहे. येथे प्राध्यापकाकडून एखादा प्रश्न तपासायचा राहिला किंवा तपासलेल्या प्रश्नांचे गुण द्यायचे राहिले तर संगणक तत्काळ सूचना देते. संगणकाच्या माध्यमातून बिनचूक निकाल जाहीर करण्यास मदत होत आहे. म्हणूनच ऑनस्क्रिन पेपर तपासणी विद्यापीठ प्रशासनाच्या फायद्याची ठरत आहे.

संगणक प्रणालीमध्ये उत्तरपत्रिका स्कॅन करून त्याचे रूपांतर पीडीएफमध्ये केले जाते. त्यानंतर पीडीएफ उत्तरपत्रिकेला सांकेतिक क्रमांक देऊन ती संबंधित विषयाच्या फोल्डरमध्ये समाविष्ट केल्यावर संगणक प्रणालीमध्ये जाते. या प्रणालीमध्ये प्रश्नपत्रिकेचे स्वरूप, आदर्श उत्तरपत्रिका, गुणदान पध्दत, परीक्षकांचे विषय निश्चित केलेले असतात. त्यामुळे परीक्षकांना त्यांच्या विषयांच्या उत्तरपत्रिका त्यांच्या लॉगईनमध्ये उपलब्ध होतात. संबंधित परीक्षकाने लॉगईन केल्यानंतर त्यांच्या विषयांतील ज्या विषयाच्या उत्तरपत्रिका तपासायच्या आहेत, तो विषय निवडल्यानंतर प्रणालीमध्ये उपलब्ध उत्तरपत्रिकांपैकी रँडम पद्धतीने एक उत्तरपत्रिका तपासणीसाठी उपलब्ध होते. तिची तपासणी पूर्ण झाल्यानंतर दुसरी उत्तरपत्रिका उपलब्ध होते. मूल्यमापन करताना परीक्षक या प्रणालीमध्ये उपलब्ध प्रश्नपत्रिका, आदर्श उत्तरपत्रिका, प्रश्ननिहाय गुणांचा वापर करतात. परीक्षकांना उत्तरपत्रिकेत विद्यार्थ्यांनी लिहीलेले उत्तर वाचून गुण देण्याची सुविधा उपलब्ध आहे. अशा प्रकारे प्रत्येक प्रश्नाचे उत्तर तपासले जाते. एखादा प्रश्न तपासायचा राहिल्यास किंवा एखाद्या प्रश्नास गुण दिले नसल्यास उत्तरपत्रिका तपासून पूर्ण होत नाही. त्यामुळे ऑनस्क्रिन पेपर तपासणी बिनचूक होत आहे.

## ऑनस्क्रिन तपासणी झालेले पेपर

| विषय | उपलब्ध पेपर | तपासणी झालेले | तपासणी न झालेले | मॉडरेशनला उपलब्ध पेपर | मॉडरेशन पूर्ण | मॉडरेशन न झालेले |
|---|---|---|---|---|---|---|
| एम.एससी. | २२७२१ | १७२६९ | ५४५२ | १८५४ | १३७६ | ४७८ |
| एम.कॉम | २७०५८ | २६९६१ | ९७ | ७६०६ | ७६०६ | — |
| एम.ए. | ३१८६५ | २६४३७ | ५४२८ | ९६७१ | ७०६२ | २६०९ |
| एम.एस.डब्ल्यू | ७४६ | ६७६ | ७० | — | — | — |
| एमबीए | १६५३५ | १२५७८ | ३९५७ | १७१७ | १६८२ | ३५ |
| बी.टेक. सी.बी.सी.एस | ३५५२८ | १७७३० | १७७९८ | ५१२ | ८१ | ४३१ |
| बी.टेक. डीओटी | ५६९१ | ४०३० | १६६१ | — | — | — |
| एम.सी.ए. सायन्स | १०४९ | ६६२ | ३५७४४ | ४४ | — | ४४ |
| बी.फार्मसी | ५३५३ | ९३ | ५२६० | — | — | — |
| एम.टेक. रूरल टेक | ४२ | ४२ | — | — | — | — |
| एकूण | १४६५९६ | १०६४७८ | ४००८८ | २१४०४ | १७८१७ | ३५८७ |

### भविष्यात सर्वच अभ्यासक्रमाच्या उत्तरपत्रिका ऑनस्क्रिन तपासणार

ऑनस्क्रिन पेपर तपासणीचा प्रयोग यशस्वी होत आहे. त्यामुळे सध्या ठराविक अभ्यासक्रमांच्या उत्तरपत्रिका ऑनस्क्रिन तपासल्या आहेत. भविष्यात सर्व अभ्यासक्रमाच्या उत्तरपत्रिका ऑनस्क्रिन तपासल्या जाणार आहेत.

-डॉ. अजितसिंह जाधव, संचालक, परीक्षा व मूल्यमापन शिवाजी विद्यापीठ